बीड । गुरूवार
२७.०२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३२०
किंमत : ३ रु. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# अजितदादा ॲक्शन मोडवर

## स्वारगेट प्रकरणात 23 सुरक्षा रक्षक निलंबित



**पुणे । प्रतिनिधी**

स्वारगेट स्थानकावर २६ वर्षीय तरूणीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेवरून राज्यातील राजकीय वातावरण चांगलचं तापलं आहे. ज्या बसमध्ये ही घटना घडली होती, तेथून सुरक्षा रक्षकाची केबिन काही अंतरावरच होती, मग सुरक्षा रक्षक कुठे गेले होते, असा सवाल करत ठाकरे गटातील वसंत मोरे यांनी एसटी डेपोची तोडफोड केली. यावरून विरोधकांनीही सरकारला धारेवर धरलं आहे. तर याप्रकरणी आता २३ सुरक्षा रक्षकांना निलंबित करण्यात आलं आहे. अशी माहिती समोर येत असून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.

स्वारगेट बसस्थानकातील घटना क्लेशदायक, संतापदायक, शरमेने मान खाली घालायला लावणारी पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात आपल्या एका भगिनीवर झालेल्या बलात्काराची घटना अत्यंत दुर्दैवी, क्लेशदायक, सुसंस्कृत समाजातील सर्वांना संताप आणणारी, शरमेने मान खाली घालायला लावणारी आहे. या गुन्ह्यातील आरोपीने केलेला गुन्हा अक्षम्य असून त्याला फाशीशिवाय दुसरी शिक्षा असू शकत नाही. मी स्वतः पुणे पोलीस आयुक्तांना यासंदर्भात व्यक्तिशः लक्ष घालून तपास




करण्याचे, आरोपीला तात्काळ अटक करण्याचे निर्देश दिले आहेत. असे अजित पवार यांनी म्हटले आहे.तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही हा गुन्हा गांभीर्याने घेतला असून पोलिसांना आवश्यक सूचना दिल्या आहेत. पोलिसांकडून आरोपीला लवकरात लवकर अटक केली जाईल आणि त्याला कायद्यानुसार कठोरात कठोर शिक्षा होईल, यासाठी राज्य शासन सर्व पावले उचलेल, हा विश्वास महाराष्ट्रातील माझ्या तमाम बंधू-भगिनी, मातांना देतो. पीडित बहिणीला न्याय, मानसिक आधार, सर्वतोपरी मदत करण्याच्या सूचना महिला व बाल विकासमंत्री तसेच राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष यांना देण्यात आल्या असल्याचेही त्यांनी सांगितले.

### नेमकी घटना काय ?

पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात एका २६ वर्षांच्या तरुणीवर अत्याचाराची घटना घडली आहे. नराधमाने चक्क बसमध्ये हा अत्याचार केला आहे. मंगळवारी पहाटे ५.३० वाजता ही घटना घडली. दत्तात्रय गाडे असं या अत्याचार करणाऱ्या नराधमाचं नाव आहे. पोलीस सध्यात त्याचा शोध घेत आहेत. दरम्यान, या घटनेनंतर राज्यभरात एकच खळबळ उडाली आहे. अत्याचार केल्यानंतर आरोपीने तरुणीला जीवे मारण्याचीही धमकी दिली. या घटनेची कोणाकडे वाच्यता केली तर जीवे मारीन असे हा आरोपी पीडित तरुणीला म्हणाला होता. त्यानंतर घडलेला हा सर्व प्रकार पीडित तरुणीने मित्राला सांगितल्यानंतर हा सर्व प्रकार उजेडात आला.

### मंत्रालयात बैठक

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वारगेट बसस्थानकातील बलात्काराच्या घटनेची गंभीर दखल घेत संबंधित बसस्थानकावरील कार्यरत असलेले स्थानकप्रमुख (सहाय्यक वाहतूक अधिक्षक) व आगार व्यवस्थापक यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्फत विभागीय चौकशी करून दोष आढळल्यास त्यांना तात्काळ निलंबित करावे, असे निर्देश उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (प्रभारी ) विवेक भीमनराव यांना दिले आहेत. तसेच एकूणच महिला प्रवाशांच्या सुरक्षे संदर्भात आढावा घेण्यासाठी उद्या एसटीच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची तात्काळ मंत्रालयात बैठक बोलाविण्याचे निर्देश देखील मंत्री सरनाईक यांनी दिले आहेत.

### अजित पवारांचा लाडक्या बहिणींना शब्द

पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात आपल्या एका भगिनीवर झालेल्या बलात्काराची घटना अत्यंत दुर्दैवी, क्लेशदायक, सुसंस्कृत समाजातील सर्वांना संताप आणणारी, शरमेने मान खाली घालायला लावणारी आहे. या गुन्ह्यातील आरोपीने केलेला गुन्हा अक्षम्य असून त्याला फाशीशिवाय दुसरी शिक्षा असू शकत नाही. मी स्वतः पुणे पोलीस आयुक्तांना यासंदर्भात व्यक्तिशः लक्ष घालून तपास करण्याचे, आरोपीला तात्काळ अटक करण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती अजित पवार यांनी ट्विटरद्वारे दिली. तसेच, याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही हा गुन्हा गांभीर्याने घेतला असून पोलिसांना आवश्यक सूचना दिल्या आहेत. पोलिसांकडून आरोपीला लवकरात लवकर अटक केली जाईल आणि त्याला कायद्यानुसार कठोरात कठोर शिक्षा होईल, यासाठी राज्य शासन सर्व पावले उचलेल, हा विश्वास महाराष्ट्रातील माझ्या तमाम बंधू-भगिनी, मातांना देतो, असा शब्दही अजित पवारांनी दिला आहे.

# उपमुख्यमंत्री मा. ना.एकनाथ शिंदे साहेबांचे हात बळकट करणार : पिंगळे, बहिर

**बीड । प्रतिनिधी**

युवा विजय दौरा महाराष्ट्राचा झंजावात युवा शक्तीच्या माध्यमातून मा. ना. एकनाथ शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी सध्या संपूर्ण महाराष्ट्रात युवा सेनेचे दौरे सुरु आहेत. मराठवाड्यातील लातूर व परभणी जिल्ह्यात युवा विजयी महाराष्ट्र दौरा हा बीडच्या पोरांनी चांगलाच गाजवला.महाराष्ट्र चे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व संसद रत्न डॉ श्रीकांत शिंदे साहेब, युवासेना कार्यध्यक्ष पुर्वेश सरनाईक साहेब यांच्या संकल्पनेतून व युवासेना मुख्य सचिव राहुल लोंढे साहेब युवासेना सचिव किरण साळी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हा युवा विजयी



दौरा महाराष्ट्र भर सुरू आहे. युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे व बीड लोकसभा निरीक्षक सागर विजय बहिर यांची नेमणूक या जिल्ह्याच्या दौऱ्या निमित्त केली गेलेली होती . लातूर व परभणी जिल्ह्यातील युवा सेना दौऱ्यात युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा मराठवाडा निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे व बीड लोकसभा निरीक्षक सागर विजय



बहिर यांनी लातूर जिल्ह्यातील ६ विधानसभा आणी परभणी जिल्ह्यातील ४ विधानसभा क्षेत्रात जाऊन युवकांच्या भेटी घेतल्या, या भेटीतून तळागळतील युवकांपर्यंत जाऊन युवा सेनेचे कार्ये युवकांपर्यंत पोहचवले आणी लातूर, व परभणी जिल्ह्यात युवा सेनेची सक्षम, बळकट बांधणी व नवीन पदाच्या नियुक्ती करण्यात आल्या तसेच नव्या युवक व युवतीचे ▶▶ उर्वरित पान २ वर

# श्री. सोमेश्वर मंदिर येथे आज ज्ञानेश्वर माऊली मंझरिकर यांच्या कीर्तनाचा व महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घ्यावा: नवनाथ शिराळे

**बीड । प्रतिनिधी**

बार्शी रोडवरील सोमेश्वर मंदिर याठिकाणी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दिनांक २० रोजी सप्ताहाला सुरुवात झाली होती. आज गुरुवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी सप्ताहाची सांगता ह.भ .प .ज्ञानेश्वर माऊली मंजरीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सकाळी दहा ते बारा या वेळेत किर्तन होईल . व लगेचच महाप्रसाद देण्यात येईल असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष नवनाथ शिराळे यांनी केले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की श्री सोमेश्वर हनुमान मंदिर



बार्शी रोड बीड या ठिकाणी गेल्या बावीस वर्षांपासून महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या प्रेरणेने अखंड हरिनाम सप्ताह सुरू सोमेश्वर ट्रस्टचे अध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे यांनी सुरु केला .आज तागायत गेल्या २२ वर्षापासून हा सप्ताह सुरू आहे .दिनांक २० फेब्रुवारी २०२५ पासून ला या वर्षी सुरु करण्यात आला. या सात दिवसांत मध्ये अनेक नामांकित महाराजांचे सुश्राव्य कीर्तने झाली .आज दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी सप्ताहाचे शेवट ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली महाराज मन जरीकर यांच्या कीर्तनेने सांगता होईल.आज गुरुवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी सप्ताहाची सांगता ह.भ .प .ज्ञानेश्वर माऊली मंजरीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सकाळी दहा ते बारा या वेळेत किर्तन होईल . व लगेचच महाप्रसाद देण्यात येईल असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष नवनाथ शिराळे यांनी केले आहे.

# संतोष देशमुख प्रकरणात ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी महाराष्ट्र सरकारतर्फे ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी आ.सुरेश अण्णा धस यांनी केली होती. या मागणीला यश आलं असून राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी उज्वलजी निकम आणि ॲड. बाळासाहेब कोल्हे यांची सहाय्यक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे देशमुख कुटुंबियांना मोठा धीर




मिळाला असून संतोष देशमुख यांना लवकरच न्याय मिळेल. अन्यायाविरुद्धचा आपला हा लढा सुरूच राहणार आहे. आरोपींना लवकरच शिक्षा होईल. या निर्णयासाठी मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचे मनापासून आभार !

# महाशिवरात्री निमित्त विविध ठिकाणच्या कार्यक्रमांना आ.संदीप क्षीरसागरांची उपस्थिती







**बीड । प्रतिनिधी**

महाशिवरात्री निमित्त बीड मतदारसंघात आयोजित केलेल्या विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांना आ.संदीप क्षीरसागर बुधवारी (दि.२६) रोजी उपस्थित होते. बीड शहरातील प्रजापिता ब्रम्हकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने आयोजित कार्यक्रम, नाळवंडी नाका परिसरातील कमलेश्वर महादेव मंदिर येथील कार्यक्रम व शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे थिगळे परिवाराच्या वतीने आयोजित कार्यक्रम या शहरातील तसेच बीड तालुक्यातील श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान व श्री क्षेत्र भवानीगड येथील दिव्य शिवपूजन सोहळ्यास आ.संदीप क्षीरसागर उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील माजी कृषिमंत्र्यांनी पिक विमा कंपन्या कडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा मिळण्यास अडथळा निर्माण झाला ?: वसंत मुंडे



**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील दोन्ही सरकार मधील माजी ३ ही कृषी मंत्र्यांनी पिक विमा कंपनीच्या माध्यमातून टक्केवारी घेतल्यामुळे पिक विमा कंपन्या नियमानुसार शेतकऱ्याला पिक विमा देण्यास अडथळा निर्माण करीत असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला. पिकाच्या नुकसानी संदर्भात शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या तक्रारी दाखल केलेले होत्या त्यात जिल्हास्तरीय,विभागीय समिती व राज्यस्तरीय तक्रार याचिका केल्या आहेत. त्यामध्ये पिक विमा कंपनीला शेतकऱ्याला पीक विम्याचे पैसे नुकसान भरपाईचे आदेश देण्यात आलेले असूनही पिक विमा कंपन्यांना माझी ३ ही कृषिमंत्र्याचा अभय असल्यामुळे शेतकऱ्याला पीक विम्याचे पैसे मिळण्यास विलंब लावीत आहेत. कोरोनाच्या काळापासून आज पर्यंत महाराष्ट्रातील नऊ पीक विमा कंपन्यांनी शासनाचे व न्यायालयाच्या आदेशाची पालन पिक विमा वाटप करण्यासंदर्भात केलेले ▶▶ उर्वरित पान २ वर



# फक्त ११ रुपयांत मिळणार विमानाचे तिकीट! 'या' ऑफरमुळे देशात खळबळ

**विमानाने प्रवास करण्याचे प्रत्येकाचे स्वप्न असते. विशेषत: भारतासारख्या देशात आजही लाखो लोकांसाठी विमानाने प्रवास करणे एखाद्या स्वप्नापेक्षा कमी नाही. पण आता असे होणार नाही. आता विमानाची तिकिटे केवळ ११ रुपयांना उपलब्ध आहेत. ही ऑफर व्हिएतनामची एअरलाइन व्हिएतजेट एअरने दिली आहे.**



व्हिएतजेट एअरने एक उत्सवी सेल सुरू केला आहे. भारत ते व्हिएतनाम विमानाची तिकिटे केवळ ११ रुपयांमध्ये उपलब्ध आहेत (कर आणि शुल्क वगळता). ही ऑफर इको क्लास तिकिटांसाठी आहे आणि ती मुंबई, दिल्ली, कोची आणि अहमदाबाद सारख्या भारतातील प्रमुख शहरांमधून व्हिएतनामच्या हो ची मिन्ह सिटी, हनोई आणि दा नांग सारख्या ठिकाणांसाठी उपलब्ध आहे.

### तिकीट कसे बुक करावे?

व्हिएतनाम एअरलाइन तळशींक्षशीं ळी ची ही ११ रुपयांची ऑफर दर शुक्रवारी उपलब्ध असेल. या ऑफरच्या वैधतेबद्दल बोलायचे झाले तर, ती ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत चालेल. तथापि, ही ऑफर मर्यादित जागांवरच लागू आहे. त्यामुळे तुम्हाला लवकर बुकिंग करावे लागेल. तिकिटे बुक करण्यासाठी, तुम्ही व्हिएतजेट एअरची अधिकृत वेबसाइट www.vietjetair.com किंवा त्यांचे मोबाइल ॲप वापरू शकता.

### ऑफरशी संबंधित इतर माहिती

Financial Express च्या वृत्तानुसार, ही ऑफर ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वैध आहे. परंतु काही ब्लॅकआउट डेट्स जसे की सार्वजनिक सुट्ट्या आणि पीक सीझन लागू होतील. म्हणजे त्या दिवशी ही ऑफर लागू नसेल. जर तुम्हाला तुमच्या प्रवासाची तारीख बदलायची असेल तर ते शक्य आहे, पण त्यासाठी ठराविक शुल्क भरावे लागेल. तुम्ही तिकीट रद्द केल्यास, परतावा तुमच्या ट्रॅव्हल वॉलेटमध्ये जमा केला जाईल, परंतु यासाठी शुल्क देखील लागेल.

### ही ऑफर खास का आहे?

ही ऑफर केवळ स्वस्तच नाही, तर भारत आणि व्हिएतनाममधील थेट कनेक्टिव्हिटीला प्रोत्साहन देण्यासाठीही हे एक मोठे पाऊल आहे. व्हिएतनाम हे सुंदर नैसर्गिक सौंदर्य, ऐतिहासिक स्थळे आणि स्वादिष्ट खाद्यपदार्थांसाठी प्रसिद्ध आहे आणि ही ऑफर तुम्हाला या सुंदर देशाला भेट देण्याची उत्तम संधी देते. तुम्हालाही एकट्याने किंवा कुटुंबासोबत व्हिएतनामला जायचे असेल तर तुमच्यासाठी ही एक उत्तम संधी असू शकते.

पान 1 वरून पुढे...

## उपमुख्यमंत्री मा. ना....

प्रवेश युवा सेनेत करवून घेण्यात आले. आगामी काळातील होऊ घातलेल्या निवडणुकांच्या अनुषंगाने लातूर आणी परभणी जिल्ह्यात मजबूत संघटन बांधणी या दौऱ्यात विपुल बाळासाहेब पिंगळे आणी सागर विजय बहिर यांनी केले या युवा कार्यकर्त्यांनी लातूर आणी परभणी जिल्ह्यात मा. ना. एकनाथ शिंदे साहेबांच्या शिवसेनेच्या युवा सेनेचा झंजावात निर्माण केला.लातूर व परभणी दौऱ्यावर असताना विपुल बाळासाहेब पिंगळे व सागर विजय बहिर यांनी पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक सुद्धा घेतली, या बैठकीत मार्गदर्शन करतांना सगळ्यात आधी विधान सभा निवडणुकीत मिळवलेल्या यशाबदल सर्वांचे आभार मानले. तसेच आगामी काळातील निवडणुका डोळयांसमोर ठेवून संघटन बांधणी,युवासेना शाखा,कॉलेज युनिट ची स्थापना करणे या बद्धल मोलाच्या मार्गदर्शना सह संगठन बांधणी करण्याचे आदेश सुद्धा विपुल बाळासाहेब पिंगळे आणी सागर बहिर यांच्याकडून देण्यात आले.खरं तर आधी आढावा बैठक म्हणून सुरु झालेल्या आढावा बैठकीला मेळाव्याचे स्वरूपचं आलेले यावेळी बघायला मिळाले.या युवा सेनेच्या झंझावती दौऱ्यात मोठ्या संख्येने युवक आणी युवतींची उपस्थिती बघायला मिळाली. एकंदरीत पाहता महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. ना एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या युवा सेनेने लातूर आणी परभणी जिल्ह्यात युवकांच्या हृदयात आपले स्थान बलकट केलेले दिसून येत आहे. आणी ह्या यशाचे शिल्पकार म्हणून विपुल बाळासाहेब पिंगळे आणी सागर विजय बहिर यांच्या सारखे पदाधिकारी एकनाथ शिंदे साहेबांच्या शिवसेनेचा आणी युवा सेनेचा झंजावात संपूर्ण मराठवाड्यात पसरवतांनां या निमित्ताने दिसून येत आहेत.

## महाराष्ट्रातील माजी...

नाही. पिक विमा कंपनीवर भाजपाच्या केंद्र व राज्यातील सरकारचे नियंत्रण नसल्यामुळे खाजगी पिक विमा कंपन्याकडून शेतकऱ्याच्या हक्काचा पिक विमा वाटपास दिरंगाई करीत आहेत.केंद्रात भाजप ,आर एस एस च्या विचाराचे सरकारने २०१६ पासून खाजगी पिक विमा कंपन्यांना संपूर्ण देशातील निविदाद्वारे कामे दिल्यामुळे शेतकऱ्यावर पिक विमा संदर्भात अन्याय झालेला असून सर्व नियमानुसार प्रधानमंत्री पिक विमा योजनेसाठी वेगवेगळे निकष केंद्र व राज्य सरकारची नियमावली व पिके पेरणी पासून काढणे पर्यंतचा कालावधीमध्ये अतिवृष्टी वीज कोसळणे नैसर्गिक गारपीट वादळ चक्रीवादळ दुष्काळ पाऊस कमी पडल्याने शेतीचे उत्पन्नावर परिणाम होतो. शासनाच्या सर्वच नियमांचे पीक विमा कंपन्या पालन करीत नाहीत. सरकारकडून २० ते ३५ टक्के पीक विमा कंपन्यांना कमिशन मिळते. त्यामुळे दोन्ही सरकारचे पिक विमा कंपन्यावर नियंत्रण नाही. खाजगी पीक विमा कंपनीची दादागिरी मुळे केंद्र व राज्य सरकार अडचणीत आले आहे.शेतकऱ्यावर एकतर्फी हक्काच्या पिक विम्याच्या पैशासंदर्भात अन्याय केला जात. केंद्रामधील व राज्यातील दोन्ही कृषी मंत्र्यांनी पिक विमा संदर्भात महाराष्ट्रात ५०० करोडो रुपया पेक्षा जास्त घोटाळा झाल्याचा सभागृहात कबुली केली असून त्यावर चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकारने १ रुपयात पिक विमा भरण्या संदर्भात शेतकऱ्याला लोभ दाखवून शेतकऱ्याची खूप मोठ्या प्रमाणावर दिशाभूल केली . शेतकऱ्याचा टक्केवारीचा हिस्सा, केंद्र व राज्य सरकारचा अर्धा हिसा एकत्र करून पीक विम्याचे विविध निकषाचे नुकसान भरपाई संदर्भात पालन करून टक्केवारी नुसार वेगवेगळ्या पिकाचा पिक विमा शेतकऱ्याला दिला जातो. त्यामध्ये खाजगी पिक विमा कंपन्यांनी पर्जन्यमापक यंत्रणा व हवामान केंद्राचे अधिकारी तसेच महसूल, कृषी अधिकारी यांच्यासोबत तोडजोड करून लोकप्रतिनिधी व कृषी मंत्री, कृषी आयुक्त , सांख्यिकी विभागाचा प्रमुख यांच्याबरोबर आर्थिक टक्केवारीची तोडजोड करून शेतकऱ्याला पिक विमा वाटप न होऊ देण्याचे खरे कारण असल्याचा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला . शासनाचे तसेच सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असूनही पिक विमा शेतकऱ्याला अडचणी टाकण्यासाठी एनडीआरएफ व एस डी आर एफ निकषचे पालन खाजगी पिक विमा कंपन्या करीत नसल्यामुळे नियमानुसार काळया यादीत टाकून सरकारने प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या खात्यात निकषानुसार पीक विम्याचे पैसे वर्ग करण्याचे आदेश काढून न्याय द्यावा . पिक विमा सुधारणा करीत असताना मानवी आरोग्य विम्या प्रमाणे शेतकऱ्यांच्या प्रत्येक पिकासाठी नुकसान झाल्यास पंचनाम्याच्या निकषा प्रमाणे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात विमा योजनेत बदल करण्याचे आदेश शासन स्तरावर काढण्यात यावेत व खाजगी पिक विमा कंपनीचा काळया यादीत समावेश करावा. राजकीय हस्तक्षेप न होता शासन स्तरावर पिक विमा कंपनीचे काम शासनाच्या एजन्सी मार्फत करण्याची मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केली.

# दरोडेखोरांचा जामखेडमध्ये धुमाकूळ ; ३ लाख २२ हजार रुपयांचा ऐवज लंपास

**जामखेड । प्रतिनिधी**

शहरापासून दोन किमी अंतरावरील साकत फाट्याजवळील एका घरावर एका महिलेसह सात ते आठ दरोडेखोरांनी चाकूचा धाक दाखवून घरातील ८ तोळे सोने व ७१ हजार रुपयांचे रोख असे एकूण ३ लाख २२ हजार ७५० रुपयांचा ऐवज लंपास केला. विशेष म्हणजे या दरोड्यात एका महिलेचा समावेश असून घटनास्थळी पोलिसअधीक्षक राकेश ओला यांनी भेट दिली आहे. दरोड्याच्या घटनेने जामखेड शहरात एकच खळबळ उडाली आहे.



पोलिसांकडून मिळालेली अशी की, जामखेड शहरापासून दोन किमी अंतरावरील बीड रोड येथील साकत फाट्याजवळ फिर्यादी महिला प्रतिक्षा शंकर रोकडे (वय १९) राहते. बुधवार दि २६ रोजी मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास या ठिकाणी एका महिला दरोडेखोरासह सात ते आठ दरोडेखोर आले. यावेळी सोबत असलेल्या आरोपी महिलेने फिर्यादी यांचे दार वाजवत आवाज दिला की 'ताई दार उघड' त्यामुळे फिर्यादी महिलेस आपलेच कोणी आले असल्याचे वाटल्याने त्यांनी दार उघडले. घराचे दार उघडताच घरामध्ये स्कार्फ बांधलेल्या महिलेसह चोरटे आत शिरले. यानंतर चोरट्यांनी किचनमधील सामानाची उचकापाचक केली. तसेच चोरट्यांनी चाकुचा धाक दाखवून सोने व रोख रक्कम लुटली . यानंतर चोरट्यांनी आपला मोर्चा वरच्या मजल्यावर रहात असलेल्या गायत्री किसन जाडकर यांच्या घराकडे वळवला. यावेळी घराला कुलुप असल्याने चोरट्यांनी दार तोडुन घरातील रोख रक्कम व सोने चोरुन नेले. अशा प्रकारे दोन्ही घरातील एकुण २ लाख ५१ हजार रुपयांचे आठ तोळे सोन्याचे दागिने व ७१ हजार ७५० रु रोख असा एकुण ३ लाख २२ हजार ७५० रुपयांचा ऐवज लंपास केला.

या घटनेत एक महिला किरकोळ जखमी झाली आहे. दरोडा पडला असल्याची माहिती फिर्यादी यांनी फोनवरून जामखेड पोलीसांना दिली यानंतर पोलीस तातडीने घटनास्थळी आले. मात्र तोपर्यंत दरोडेखोर पळुन गेले. घटनास्थळी सकाळी पोलीस अधीक्षक राकेश ओला, पोलीस उपअधीक्षक प्रशांत खैरे, स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, जामखेड पोलीस स्टेशनचे सपोनि सोनवलकर, सपोनि वर्षा जाधव मॅडम व जामखेड व अहील्यानगर चे स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने भेट दिली. या प्रकरणी एका महिलेस एकुण सात ते आठ दरोडेखोरांवर जामखेड पोलीस स्टेशनला दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि वर्षा जाधव या करत आहेत.

# बीड जिल्हा पुरुष व महिला अजिंक्यपद खो-खो स्पर्धा व निवड चाचणी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनची सन २४-२५ सालाची ६० वी पुरुष महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धा शेवगाव जिल्हा अहिल्यानगर येथे दिनांक १३ ते १६ मार्च २०२५ या कालावधीत संपन्न होणार आहे. तरी बीड जिल्ह्याचा प्रतिनिधित्व करणारा जिल्ह्याचा पुरुष व महिला संघ सहभागी होणार आहे. त्यासाठी दिनांक २/३/२०२५ वार रविवार रोजी बीड जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा शारदा स्पोर्ट्स अॅकॅडमी गेवराई, येथे दिनांक २/३/२०२५ सकाळी.९:०० रविवार होणार आहे तरी या स्पर्धेतून जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारा संघ निवडण्यात येणार आहे. त्यासाठी निवड समिती गठीत करण्यात आली आहे निवड समिती सदस्य म्हणून १).श्री.बंडू घोरड (बीड) २) श्री.रमेश पिसाळ (बीड) ३) श्रीमती.सुनिता जायभाये (बीड) ४) श्री.माधव जायगुडे (बीड) हे निवड समिती सदस्य म्हणून संघ निवडण्याचे काम करतील.तरी जिल्ह्यातील सर्व पुरुष व महिला खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेऊन जिल्ह्याच्या संघामध्ये स्थान मिळण्याचा प्रयत्न करावा. असे आव्हान जिल्हा खो-खो संघटनेचे अध्यक्ष श्री ऋषिकेश शेळके व सचिव श्री विजय जाहेर यांनी केले आहे. जास्तीत जास्त खेळाडूंनी आणि संघाने स्पर्धेत सहभाग घ्यावा.

पान ४ वरून पुढे...

## अनिलदादांनी पालकत्व...

आहे. अगदी याप्रमाणेच बीडमध्ये देखील आज युवाविजय दौऱ्यातील आढावा बैठका संपन्न होत आहेत. शिवसेना पक्षाला ताकद देण्यासाठी, पक्षाची ताकद वाढविण्यासाठी आम्ही सर्व युवांनी वज्रमुठ आवळली असून आता चाळीस वर्ष राजकारणात राहून शिवसेना पक्ष बांधणीसाठी सर्वोपरी योगदान देणारे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी एक मोठा भाऊ या नात्याने बीड जिल्हा युवासेनेचे पालकत्व स्वीकारून युवासेना मजबूत करावी असे अहवान युवसेना मराठवाडा सचिव निलेश भाऊ शिंदे यांनी युवाविजय मराठवाडा दौऱ्याच्या पदाधिकारी आढावा बैठकीत केले. काल दि. २५ फेब्रुवारी रोजी बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे युवाविजय मराठवाडा दौऱ्यातील पदाधिकारी आढावा बैठक संपन्न झाली. या आढावा बैठकीसाठी युवासेना मराठवाडा सचिव निलेश भाऊ शिंदे, युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, युवासेना मराठवाडा युवती निरीक्षक आकांक्षाताई चौगुले, युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख स्वप्नील भैय्या गलधर उपस्थित होते. जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवासेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांनी आपल्या प्रस्ताविकता शिवसेना, युवासेना पदाधिकाऱ्यांचं स्वागत करत युवासेनेच्या कार्याचा आढावा मांडला व पुढील वाटचालीसाठी आम्हाला सहकार्य मार्गदर्शनाची आवश्यकता असून आम्ही पूर्ण ताकदीने बीड जिल्ह्यात युवासेनेची ताकद वाढवू असा शब्द दिला. युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी आपल्या भाषणामध्ये अनिल दादा हे मला गुरुस्थानी असल्याचे नमूद केले तर विनाकारण आमच्या दोघांमध्ये कुठलेही वैर नसताना पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये गैरसमज निर्माण झालेले असल्याचे मत बाजीराव चव्हाण यांनी मांडले. युवासेना मराठवाडा युवती निरीक्षक आकांक्षा ताई चौगुले यांनी युवा हा राज्याच्या

पान ४ वरून पुढे...

आणि देशाच्या विकासाचा मजबूत पाया असल्याने युवसैनिकांनी मोठ्या ताकदीने युवासेनेची ताकद वाढवण्या बाबत मार्गदर्शन केले. यानंतर युवासेना आयोजित युवा विजय मराठावाडा दौऱ्यातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न झाली व याबरोबरच बीडमध्ये युवा विजय मराठावाडा दौऱ्याची सांगता देखील झाली. दरम्यान आढावा बैठकीसाठी जिल्हाभरातून शिवसेना, युवसेना, शेतकरीसेना महिला आघाडीचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यामध्ये मनाई ....

आरोपीनां कठोर शासन व्हावे या मागणीकरिता अचानक आंदोलन करत आहेत. राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागणीसाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यदी होण्याची शक्यता आहे. तसेच दि. ११ फेब्रुवारी २०२५ पासून इयत्ता १० वी आणि २१ फेब्रुवारीपासून १२ वी बोर्डाची परिक्षा सुरु होत आहेत. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते १ मार्च २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.

पान ४ वरून पुढे...

## विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या...

सहभाग घेत यश मिळवणे सोपे जाईल असे सांगितले . या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते . मा. श्री. पानझडे साहेब शहर अभियंता संभाजीनगर , श्री .इंगळे साहेब ,बीड़ , मा.श्री .विजय (दादा ) पोकळे राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष ,मा.श्री .शंकर सुस्कर,( राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष) मा.श्री .राजे सोळुंके साहेब (राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष ),अँड ,फिडेल चव्हाण,जिल्हा न्यायालय ,मा.श्री .गणेश पवार सिविल इंजीनियर ,मा.श्री .महेश पवार (संचालक तिरुपती बॅटरी ),मा.रमेश घुमरे साहेब (विमान प्राधिकरण विभाग) ,संभाजीनगर,मा.श्री .रामराव ज्योतिक (सेवानिवृत्त भारत संचार निगम ऑफिस) अहिल्यानगर, श्री .दीपक पांडुरंग सरवदे सर ,श्री अमृत विजय उदमले ,श्री डॉ .रविन्द्र घुमरे, या सर्वानी मनाली आणि हर्षाली हिचे कौतुक व अभिनंदन केले.

## वडवणीत डिजेमुक्त...

असून यामध्ये विविध सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक कार्यक्रमांचे भरगच्च आयोजन करण्यात आलेले आहे, शुक्रवार दि.२८ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य मिरवणुक दुपारी ४ ते सायंकाळी १० वाजेपर्यंत पार पडणार आहे. मिरवणूकीची सुरूवात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जिवाजी महाले चौक, संविधान चौक, स्व.वसंतराव नाईक चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक,ते चाटे चौक येथे मिरवणुकीचे विसर्जन होणार आहे. या मिरवणुकीत कोल्हापूर येथील कलाकारांची प्रसिध्द नादमय ढोल ताशा ध्वजपथक, कोल्हापुर येथील युवक युवतींचे शिवकालीन युध्दकला खेळ पथक, धार्मिक कार्यक्रमांमध्ये पारंपारिक वारकरी वेशभूषामध्ये बाल वारकरी भजनी मंडळातील विविध खेळ, छत्रपती शिवाजी महाराजांचा

पान ४ वरून पुढे...

मेघडंबरी राजमहाल आकर्षक देखावा, महाराष्ट्रातील अकलुज येथील प्रसिध्द हलगी पथक, उंट, घोडे देखावा सादर करण्यात येणार आहेत. भव्य दिव्य मिरवणुकीमध्ये सहभागी महिला व युवक पुरुषांना फेटेधारी महिला मंडळ व फेटेधारी युवक मंडळ, संपूर्ण शहरामध्ये निरनिराळ्या कलरमध्ये फटाक्यांची आतिषबाजी, वडवणी शहरात विद्युत रोषणाई, लेझर शो लाईट यांसह आदी भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून डिजेमुक्त जयंती साजरी करण्यात येणार असून त्यामुळे यंदाचा हा शिवजन्मोत्सव सोहळा ऐतिहासीक ठरणार आहे. तरी या सर्व भरगच्च कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन वडवणी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे अध्यक्ष संतोष डावकर यांनी पत्रकार परिषदेत केले आहे. या पत्रकार परिषदेस नगराध्यक्ष शेषेराव जगताप, अमरसिंह मस्के, शिवाजी तौर, सचिव स्वप्निल मस्के, खजिनदार दत्तात्रय जमाले, उपाध्यक्ष बबलु शेळके, प्रसिद्धप्रमुख अविनाश मुजमुले, पांडुरंग कदम, सोमनाथ मस्के, सुरेश भोरे, प्रमेश्वर मस्के, हानुमंत शिंदे, सह आदी शिवजन्मोत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## पर्यावरण मंत्री...

मळीचे ॲसिडियुक्त पाणी यामुळे हवामानात दोष निर्माण झाला आहे तर कारखान्यातून निघणाऱ्या धुराचे पण माजलगाव शहरातील जनतेच्या घरात, शरीरावर पडत आहे यामुळे अंगाला खाज सुटणे श्वासनास् त्रास जाणवणे असे प्रकार होत आहेत तर जवळच असलेल्या खरात आडगाव येथे मळीचे दुर्गंधीयुक्त पाणी एक असल्यामुळे जनावरांसह नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे बीड जिल्ह्यातीलच पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे असल्यामुळे वेळीच लक्ष देऊन जनतेच्या आरोग्याशी होणारा खेळ थांबवतील अशी आशा गावकऱ्यांच्या वतिने व्यक्त होत आहे यावर वेळीच उपाय न केल्यास गावकरी तीव्र आंदोलन असे बोलले जात आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# पिंपळेश्वराच्या दर्शनासाठी लोटला भक्तांचा महासागर

## आ.धस यांनी सपत्नीक केला महाभिषेक

**आष्टी । प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे याही वर्षी आष्टी शहरातील पिंपळेश्वर महादेव मंदिराच्या प्रांगणात महाशिवरात्री निमित्त भक्तांचा महासागर लोटला.महाशिवरात्रीच्या प्रारंभी आ.सुरेश धस यांनी सपत्नीक महाभिषेक केला.तर पहाटे ४ ते ७ वाजेपर्यंत सार्वजनिक अभिषेक संपन्न झाले.मात्र यावर्षी भाविकांच्या प्रचंड गर्दीने आत्तापर्यंतचे सर्व रेकॉर्ड मोडले असल्याचे यावेळी दिसून आले. बुधवारी महाशिवरात्री निमित्त आष्टी शहरातील ग्रामदैवत असलेल्या पिंपळेश्वर महादेव मंदिरात पहाटे पासूनच भक्तांची रीघ लागली होती.तत्पूर्वी आ.सुरेश धस यांनी प्रारंभी सपत्नीक महाभिषेक केला.या प्रसंगी निवृत्त जिल्हाधिकारी सुनील चव्हाण हे देखील उपस्थित होते.पहाटे ४ ते ७ यावेळेत भाविक भक्तांनी भक्तांचे अभिषेक संपन्न झाले.सकाळी ७ वाजल्यापासूनच मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर भक्तांनी गर्दी केली होती.रात्री उशिरापर्यंत या गर्दीने मंदिर परिसर फुलून गेला होता.मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तर सायंकाळी फटाक्याच्या आतषबाजीने सर्वांचे लक्ष वेधले होते.आष्टी तालुक्यासह राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांनी दर्शन घेतले.सायंकाळी पारंपरिक गोंधळ गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. तर भाविकांसाठी उपवासाच्या निमित्ताने महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले होते.आज गुरुवार दि.२७ रोजी दुपारी शहरातून पारंपरिक वाद्यासह पिंपळेश्वर महादेवाच्या प्रतिमेची भव्य शोभा यात्रा संपन्न होणार असून या शोभायात्रेत सहभागी होण्याचे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### शिव पार्वती रांगोळीने लक्ष वेधले.

**या वेळी मंदिर परिसरात श्रीमती कोमल थेटे यांनी भगवान शिव– पार्वती रांगोळीच्या माध्यम ातून साकारलेल्या प्रतिकृतीने सर्वांचे लक्ष वेधले.तब्बल ५ तास ही रांगोळी काढण्यासाठी लागले. ४ ÷ ६ आकारात ही रांगोळी साकारण्यात आली होती.**

### मोफत चहाचे वाटप

**शहरातील हॉटेल व्यावसायिक असलेले दत्ता राऊत यांनी सालाबादप्रमाणे यंदाही भाविकांसाठी मोफत चहाचे वाटप केले होते.त्यामुळे आलेल्या प्रत्येक भाविकांनी याचा लाभ घेतल्याने ही अविरत सेवा कायम ठेवण्याचा संकल्प दत्ता राऊत यांनी बोलून दाखवला.**




# योगेश्वरी शिक्षण संस्थेने उभारले मराठवाड्यातील सर्वात मोठे तारांगण

**खगोलशास्त्रीय गोष्टींचा थरारक अनुभव ; ग्रामीण भागातून वैज्ञानिक, खगोलशास्त्रज्ञ घडविण्यासाठी संस्थेचा उपक्रम**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून श्री योगेश्वरी शिक्षण संस्था, अंबाजोगाई संचालित पू. बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्राच्या तारांगण प्रकल्पाचे उद्घाटन होत आहे. प्रसिद्ध खगोलतज्ज्ञ श्री. हेमंत मोने आणि श्री. एल. के. कुलकर्णी यांच्या उपस्थितीत हा भव्य सोहळा पार पडणार आहे. शंभर वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या योगेश्वरी शिक्षण संस्थेने ग्रामीण भागात वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाळे सरांच्या प्रेरणेतून साकारलेले हे



तारांगण आज मराठवाड्यातील सर्वात मोठे तारांगण ठरणार आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागावी आणि खगोलशास्त्राचा थेट अनुभव घ्यावा, यासाठी ही आधुनिक सुविधा उभारण्यात आली आहे. मराठवाड्यातील सर्वात मोठे आणि अत्याधुनिक हे तारांगण ८ मीटर व्यासाचे असून, एका वेळी ४० प्रेक्षकांची आसनव्यवस्था आहे. वातानुकूलित सुविधा, उत्कृष्ट ध्वनी आणि प्रकाशयोजना यामुळे विद्यार्थी आकाशगंगा, ग्रह, तारे, नक्षत्रे, कृत्रिम उपग्रह यांसारख्या खगोलशास्त्रीय गोष्टींचा थरारक अनुभव घेऊ शकतील. या तारांगणात ३ऊडळपसश्रश ऋळीह एूश डञपी डिजीटल प्रोजेक्टर वापरण्यात आला असून, ५० हून अधिक खगोलशास्त्राशी संबंधित शो मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांमध्ये उपलब्ध असतील. विशेषतः इळेसीरहि्ेष णपर्ळींशीश हा प्रसिद्ध शो विद्यार्थ्यांसाठी आकर्षण ठरणार आहे. हा विज्ञानप्रकल्प २.५ कोटी रुपये खर्चून, कोणत्याही शासकीय मदतीशिवाय केवळ लोकसहभाग आणि माजी विद्यार्थ्यांच्या योगदानातून साकारला आहे. पूर्वी तारांगणाचा अनुभव घेण्यासाठी विद्यार्थ्यांना मुंबई, पुणे, हैदराबाद येथे जावे लागत असे, मात्र आता बीड जिल्ह्यातच अत्यंत माफक दरात ही सुविधा उपलब्ध होणार आहे.

# बीड जिल्हा युवा सेनेचा बालेकिल्ला झालाय : निलेश शिंदे

**जिल्हाध्यक्ष रविराज बडे व सुजित शिंदे यांचे उत्कृष्ट नियोजनात युवा विजय दौरा संपन्न**

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात अलिकडेच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचा तब्बल साठ जांगावर विजय मिळवला असुन या पार्श्वभुमिवर युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांणी युवासेनेच्या माध्यमातुन हा विजय साजरा करत संघटना बांधणी वर लक्ष घातल्याचे दिसून येत आहे, याचाच भाग म्हणून संपुर्ण राज्य भर युवा विजय दौरा आयोजित करण्यात आला होता याचाच दुसरा टप्पा हा बिड जिल्ह्यात मोठ्या थाटामाटत पार पडला या दौऱ्यासाठी युवासेना विभागीय सचिव निलेशजी शिंदे युवासेना



युवती निरीक्षक ड.आकांक्षा चौगुले व युवासेना निरीक्षक बाजीराव चव्हाण हे उपस्थीत होते या संपूर्ण दौर्याचे नियोजन पाहता बीड जिल्हा युवा सेनेचा बालेकिल्ला झालाय असे वक्तव्य युवा सेना सचिव निलेश शिंदे यांनी व्यक्त केले युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष रविराज बडे व जिल्हाध्यक्ष सुजीत शिंदे यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाल्याचे जिल्ह्यात बोलले जात आहे. या दौर्याची सुरवात परळी येथील गोपीनाथगड येथे स्व. गोपीनाथ मुंडे साहेब यांचे दर्शण घेवुन श्री क्षेत्र वैद्यनाथ मंदिर येथे दर्शनाणे झाली त्यानंतर परळी तालुका सुवासेना पदाधिकारी यांची शासकीय विश्रामगृह येथे बैठक पार पडली यावेळी तसेच अंबाजोगाई येथे योगेश्वरी मातेचे दर्शण घेवुन अंबाजोगाई येथे तालुका शिवसेना कार्यालय येथे पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले त्यानंतर रात्री उशीरापर्यंत केज तालुका युवासेना पदाधिकारी बैठकीला रात्री ९ वाजता देखील लक्षणीय उपस्थिती दिसली रात्री नेकनूर येथे फुटबॉल मॅचला उपस्थित दर्शवली त्यानंतर दिनांक २४ फेब्रुवारी रोजी माजलगाव विधानसभेत विविध ठिकाणी जोरदार कार्यक्रमांचे आयोजन केले होते वडवणी येथे मोठ्या जल्लोषात दौर्याचे स्वागत करण्यात आले असुन वडवणी व धारूर विधानसभेची पदाधिकारी बैठक ही धारूर येथे संयुक्त रीत्या विस्तारात पार पडली.



*बीड : शहरातील कै. शिवाजी धांडे नगर भागातील छत्रपती कॉलनी येथे आ.संदीप क्षीरसागर यांनी सिमेंट रस्ता व नालीबांधकामाचे उद्घाटन केले. तसेच याच भागात मोठ्या नाल्याचे काम सुरु आहे. त्याचीही आ.क्षीरसगरांनी पाहणी केली व काम दर्जेदार करण्याबाबत संबंधितांना सुचना दिल्या.*

# घातक हत्यारानी मारहाण करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता : ॲड गणेश हनुमंत तावरे

**बीड । प्रतिनिधी**

मा. मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब बीड यांच्या न्यायालयात दिनांक २४/२/२०२५ रोजी फिर्यादी व त्याचे पत्नी व मुलगी यांना शिवीगाळ करुन लाकडी दांडा लोखंडी चैन व चाकूने म ारहाण करून गंभीर दुखापत करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या त्या प्रकरणी रमेश भिकाजी थोरात



गणेश भिकाजी थोरात व इतर आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.

यातील आरोपीतांनी फिर्यादी व त्याचे पत्नी व मुलगी यांना शिवीगाळ करुन लाकडी दांडा लोखंडी चैन व चाकूने मारहाण करून गंभीर दुखापत करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या त्या प्रकरणी रमेश भिकाजी थोरात गणेश भिकाजी थोरात व इतर विरुध्द गु.र.क्र.११/२०२० कलम ३२६,३२३,५०४,५०६,३४ भा.दं.वि प्रमाणे दोषारोप मा . कोर्टात दाखल झाले होते . न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले. सदर दोषारोपपत्र ठउउ/२४५/२०२० पडला. सदर दोषारोपाच्या अनुषंगाने ना. न्यायालयामध्ये फिर्यादी तसेच प्रत्यक्षदर्शनी साक्षीदार व इतर साक्षीदारांची महत्त्वाची साक्ष नोंदवण्यात आली. सदर साक्ष पुराव्यामध्ये आरोपीच्या बाजुने घेण्यात आलेला बचाव मा. न्यायालयाने ग्राह्य धरून सबळ पुराव्या अभावी मा. न्यायालयाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने ड गणेश हनुमंत तावरे यांनी भक्कम बाजु मांडली.

### अवसायकांची नामतालिका (पॅनेल) साठीअर्ज सादर करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सहकारी संख्या अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये जिल्ह्यातील अवसायनातील संस्थांचे कामकाजासाठी अवसायकांची नामतालिका (पॅनेल) तयार करण्यासाठी खालोल व्यक्तिंकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश आणि सेवानिवृत्त विधी अधिकारी, प्रक्टीसिंग ॲडव्होकेटस्, चार्टर्ड अकौन्टट, कॉस्ट अकौन्टट, कंपनी सेक्रेटरी, बँका यांचे सेवेतील व्यवस्थापक

# तलाठ्यांनी तालुक्याला थाटली कार्यालय ; शोधताना शेतकऱ्यांची होतय दमछाक

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारु तालुक्यातील शेतकऱ्यांना महसुली सुविधा आपल्या गावातच सुरळीत मिळाव्यात शेतकऱ्याच्या वेळ व आर्थिक बचत व्हावी या उद्देशाने तालुक्यामध्ये शासनाने लाखो रुपये खर्चून तलाठी सज्जाच्या इम ारतिचे बांधकाम केले आहेत परंतु मागील अनेक वर्षापासून या इम ारती मध्ये तलाठी कार्यालय सुरूच झाली नाहीत तलाठ्यांनी शहरात च भाड्याच्या खोलीत कार्यालय थाटली आहेत.

अनेक वर्षापासून या इमारती वापरा अभावी बेवारस पडल्या आहेत याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग महसूल विभाग व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष केल्याचे दिसते. याचा नाहक त्रास तालुक्यातील शेतकऱ्यांना सहन करावा लागतो. तलाठी सज्जाच्या इमारती वापरा अभावी पडून आहेत या इमारती



वापरात नसल्यामुळे मोठ्या प्रम ाणावर इमारतीचे नुकसान झाले आहे . सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे या इमारती जमीन दोस्त होण्याच्या मार्गावर आहेत शासनाने लाखो रुपये खर्च करून तलाठी कार्यालय व निवासस्थाने उभारली आहेत ती कोणाच्याच वापरात नाहीत सज्ज्याच्या मुख्यालयी कार्यालयातून तलाठी कामकाज सुरू करावे अशी मागणी तालुक्यातील शेतकरी करत आहेत. तलाठ्याकडील कामासाठी शेतकऱ्यांना धारूर शहरांमध्ये येऊन तलाठी कार्यालय शोधावी लागतात यामध्ये शेतकऱ्यांचे आर्थिक व वेळेचेही नुकसान होत आहे शेतकऱ्यांची होणारी फरफट थांबावी याकडे प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन तलाठी सज्जाच्या उभारलेल्या इमारती मधून तलाठी कार्यालय सुरळीत सुरू व्हावीत अशी मागणी शेतकरी व तालुक्यातील नागरिक करत आहेत .



*राष्ट्रसंत गाडगे बाबा सार्वजनिक जयंती उत्सव समिती यावेळीगाडगे बाबांना अभिवादन करताना ॲड.गोविंद शिराळे, सुधीर जाधव, धोंगडे मामा, महेंद्र वाघमारे .*

# लिंबागणेश येथे शिवजयंती निमित्त क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले लिखित 'तृतीय रत्न' महानाट्य सादर ; डीजेमुक्त शिवजयंती साजरी





**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे रयतेचे राजे स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सव निमित्त रविवार आणि सोमवार असे दोन दिवशीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मागील ३ वर्षांपासून लिंबागणेश येथे डीजे मुक्त तसेच सांस्कृतिक कार्यक्रमातुन शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येतो. रविवारी ( दि.२३ फेब्रुवारी) रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले लिखित तृतीय रत्न म हानाटकाचे आयोजन करण्यात आले होते. लिंबागणेशचे भुमिपुत्र प्रा. लेनाजी गायकवाड यांच्या संकल्पनेतून भालचंद्र विद्यालयातील ८-९ वी च्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी नाटक सादर केले या नाटकास ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. दुसऱ्या दिवशी सोमवार दि.२४ रोजी सायंकाळी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. सजवलेल्या रथातून छत्रपती शिवरायांची प्रतिमेची मि रवणूक काढण्यात आली विशेष आकर्षण म्हणून संगमेश्वर हलगी पथक कुर्ला बीड, तसेच खालसा स्पोर्ट अक्ॅडमी पाटोदा यांची चित्तथरारक प्रात्यक्षिके आणि लिंबागणेश येथील भालचंद्र विद्यालयातील ढोल पथक आणि लेझीम पथकाने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले.यासाठी शाळेचे शिक्षक सचिन वाणी यांनी विशेष परिश्रम घेतले. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी म ोठ्या प्रमाणावर आपले योगदान दिले. शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# हर हर महादेव..!






*शिवालय गजबजली बुधवारी महाशिवरात्री निमित्त बीड सह जिल्ह्यातील महादेवाच्या मंदिरात मध्ये हजारो भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणामध्ये गर्दी केली होती.*

# अनिलदादांनी पालकत्व स्विकारून बीडमध्ये युवासेना मजबूत करावी: निलेश शिंदे

## युवा विजय मराठवाडा दौऱ्यात बीडमध्ये पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट आदरणीय बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांचा आशीर्वाद घेऊन महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख पुर्वेशजी सरनाईक साहेब यांच्या मार्गदर्शन नेतृत्वाखाली युवासेना आयोजित युवाविजय मराठवाडा



दौरा पार पडतो आहे. या दौऱ्यात ठिकठिकाणी पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठका देखील घेण्यात येत ▶▶ उर्वरित पान २ वर

### युवासेनेच्या सहकार्यासाठी सदैव तत्पर:अनिलदादा जगताप

**शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा यांनी आपल्या भाषणात युवसैनिकांना संबोधित करताना सांगितले की, आपण महाराष्ट्रवासियांना आदर्शवत असणाऱ्या एकनाथजी शिंदे साहेबांचे कार्यकर्ते आहोत. कार्यकर्त्यांना वेळ देणे, त्यांना जपने हा शिंदे साहेबांचा स्वभाव आहे. शिंदे साहेबांनी मुख्यमंत्री असताना अडीज वर्षात अठरा अठरा तास सर्व सामन्यांसाठी केलेल्या कार्यामुळे आपल्याला गावख्येड्यात ओळख मिळाली आहे. शिंदे साहेबांमुळेच समाजात आपला आदर सन्मान वाढला आहे. हे युवसैनिकांनी लक्षात घेऊन युवासेनेची वाटचाल सुरु ठेवावी. याबरोबरच संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे हे शिवसेनेचे आणि युवासेनेचे सर्व कामकाज पाहताना शिवसैनिकांना आणि युवासैनिकांना मोठा आधार देण्याचा सर्वोपरी प्रयत्न करतात. एवढेच नाही तर त्यांचं सातत्याने म्हणणं असतं की, जो काम करेगा वो आगे आयेगा, अगदी याच प्रमाणे युवा सैनिकांनी आपल्या कामातून मोठं व्हावं आणि आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब, डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांना ताकद द्यावी. युवासेना प्रमुख पूर्वेशजी सरनाईक साहेब हे देखील युवासेनेला भरभक्कम साथ देण्यासाठी सदैव पुढाकार घेऊन काम करतात, युवासैनिकांना पुढे आणण्यासाठी नियमित धडपड करतात यामुळे युवासैनिकांनी कुठलाही किंतु परंतु न ठेवता पूर्ण ताकदीने पक्ष बांधणीच काम करावं. मी २००६ पासून शिवसेनेचे इमानदारीने काम केले असून इथून पुढे जिथे जिथे युवासेनेला माझी गरज भासेल तिथे तिथे मी युवासेनेला सहकार्य करण्यासाठी उपस्थित राहिल. असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या भाषणात युवासेनेला सांगितले.**

### जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

**बीड । प्रतिनिधी**

मराठा, ओबीसी,धनगर समाजाच्या वतीने आरक्षण मागणी अनुषंगाने आंदोलने चालु आहेत.तसेच मराठा आरक्षणाचे मागणीवरुन मनोज जरांगे हे दि. २५ जानेवारीपासून मराठा समाजाला सोबत घेऊन सामुहिक आमरण उपोषणास बसले आहेत. सध्या बीड जिल्हयात पोलीस स्टेशन केज येथे दाखल असलेल्य गुन्हयाच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष संघटना यांच्याकडून सदर गुन्हयाच्या अनुषंगाने ▶▶ उर्वरित पान २ वर




# विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन सरळ सेवेत दाखल व्हावे : राजेंद्र पवार

**बीड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालय शाहू नगर बीड़ येथील शाळेत इयत्ता १० वी मध्ये शिक्षण घेत असलेली विद्यार्थिनी कु. मनाली बाळू खांडेकर या विद्यार्थिनीचा सिल्वर झोन ऑलिम्पियाड स्पर्धेत चार विभागात पहिला क्रमांक आला आहे .त्यामुळे नुकताच तिचा सत्कार करण्यात आला .मनाली हिने वेगवेगळ्या ऑलिम्पियाड प्रकारात सहभाग नोंदवत होता स्टेम ऑलिम्पियाड , इन्फॉर्मेशन ऑलिम्पियाड , हिंदी ओलम्पियाड ,सोशल सायन्स ओलम्पियाड अशा चार



ऑलिम्पियाड स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला त्यामुळे संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात नुकताच सत्कार करण्यात आला .त्याच बरोबर हर्षाली बाळू खांडेकर या विद्यार्थिनीचा पण दोन इंग्लिश आणि सायन्स ओलम्पियाड मध्ये दोन सुवर्ण पदक मिळवले तिचाही सत्कार करण्यात आला . सत्काराला राजेंद्र पवार सेवानिवृत्त हेड बेलिफ ( जिल्हा न्यायालय) यांनी यशवंत विद्यार्थिनी चे कौतुक करताना सांगितले की ,आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थी हा फक्त परीक्षार्थी न बनता विविध विषयात ज्ञान मिळवून उच्च पदावर आपल्या अभ्यासातून नियुक्ती घेऊन शासकीय सेवेत दाखल होने साठी प्रयत्न करावे , त्यांनी आपल्या सेवा कालखंडात समाज आणि आपल्या कार्यक्षेत्रात असलेल्या विविध क्षेत्रात आपले योगदान देणे गरजेचे आहे .त्यासाठी कठोर मेहनत घेऊन स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी स्पर्धा परीक्षा तयारी साठी राष्ट्रीय ,आंतरराष्ट्रीय ओलम्पियाड सारख्या परीक्षा मध्ये मध्ये ▶▶ उर्वरित पान २ वर

# वडवणीत डिजेमुक्त ऐतिहासिक शिवजन्मोत्सव सोहळा साजरा होणार

## संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती राहणार

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता भव्य दिव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत शिवभक्त म्हणून संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांची उपस्थिती राहणार आहे. यामध्ये



छत्रपती शिवाजी महाराजांचा मेघडंबरी राजमहाल आकर्षक देखावा सादर करण्यात येणार आहे. तसेच मिरवणुकीमध्ये कोल्हापूर, अकलुज येथील नामांकित विविध पथक कला सादर करणार असून ऐतिहासिक डिजेमुक्त सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा साजरा होणार असल्याची माहिती सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने बुधवार दि. २६ फेब्रुवारी रोजी पत्रकार परिषदेत दिली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ चे आयोजन करण्यात आले ▶▶ उर्वरित पान २ वर

**मिरवणुकीचे आकर्षण : वारकरी पथक, हलकी पथक, मावळा पथक, छत्रपती शिवाजी महाराजांचा मेघडंबरी राजमहाल आकर्षक देखावा, ढोल पथक, कोल्हापूरचे शिवकला पथक,उंट,घोडे देखावा.**

### रब्बीच्या ई पीक पाहणी साठी उरले फक्त दोन दिवस बीड तालुक्यात तहसीलदार शेतकऱ्यांच्या बांधावर



**चौसाळा । प्रतिनिधी**

रब्बी हंगामाच्या ई पीक पाहणी साठी शेवटचे दोन दिवस उरले आहेत. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली बीड महसूल चे पूर्ण कर्मचारी कर्मचारी तहसीलदार नायब तहसीलदार मंडळ अधिकारी तलाठी हे गावागावात जाऊन ई पीक पाणी सहाय्यकामार्फत शेतकऱ्यांची ई पीक पाहणी पूर्ण करून घेत आहेत प्रत्येक बांधावर जाऊन लोकेशन प्राप्त झाल्यानंतरच सत्य परिस्थितीचा फोटो घेऊनच ई पीक पाणी करावी लागते त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात पिक विमा मध्ये होणारा भ्रष्टाचार याला आळा बसणार आहे चौसाळा येथील पाण्याची पाहणी करण्यासाठी काल एच डी एम मॅडम कविता जाधव यांनी भेट दिली. बुधवार रोजी नायब तहसीलदार हजारे यांनी शेतात जाऊन ई पीक पाहणी सहाय्यकामार्फत कशी पाहणी केली जाते ती योग्य आहे का व पुढील मार्गदर्शन केले. चौसाळा येथील सर्वे नंबर ५२ मध्ये ई पीक पाहणी करताना नायब तहसीलदार सुहास हजारे चौसाळा मंडळ अधिकारी जायभाय चौसाळा सज्याचे तलाठी निर्मळ व ई पीक पाहणी सहाय्यक प्रसाद(बाबू ) देशमुख यांनी पाहणी केली.

# पर्यावरण मंत्री पंकजाताई लक्ष द्या...

## जय महेश च्या दूषित पाण्यामुळे खरात आडगावकरांचे आरोग्य धोक्यात वेळीच आवर घाला अन्यथा तीव्र आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

संतोष रासवे जय महेश शुगर इंडस्ट्रीज लिमिटेड पवारवाडी येथील कारखान्याचे मळी युक्त दूषित पाणी खरात आडगाव इथे येत असल्यामुळे गावकऱ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे यासाठी कारखाना प्रशासनाने वेळीच दखल घेऊन गावकऱ्यांच्या आरोग्याशी होणारा खेळ थांबवावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा खरात आडगाव येथील जनतेच्या वतीने देण्यात आला आहे तर पर्यावरण मंत्री



पंकजाताई मुंडे यांनी वेळच लक्ष घालून जय महेश च्या दूषित पाण्यामुळे पर्यावरणावर आणि गावकऱ्यांच्या आरोग्यावर होणारे परिणाम थांबवावेत अशी मागणी गावकऱ्यातून बोलले जात आहे

माजलगाव तालुक्यातील पवारवाडी येथील जय महेश शुगर इंडस्ट्रीज च्या दूषित पाण्यामुळे कारखाना परिसरातील अनेक गावचे आरोग्य धोक्यात आले आहे ▶▶ उर्वरित पान २ वर

### जय महेश ला हुजऱ्या पुढार्यांची साथ

**जय महेश साखर कारखान्यातून मळी युक्त, दुर्गंधी ग्रस्त पाणी वाहत असल्यामुळे परिसरातील जनतेच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे मात्र माजलगाव तालुक्यात हप्ता पुढाऱ्यांनी उच्छाद मांडला आहे तुम्ही आमचा आर्थिक फायदा करा आम्ही तुमचं संरक्षण करू असे म्हणणारे पुढारी असल्याने जय महेश कारखाना पर्यावरण मंत्र्याला जुमानतो की नाही हे आता भविष्यकाळात दिसून येईल**